FORM-IA

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि मुंबई पहिली खबर क्र. ०७, वर्ष २०१८, दिनांक १५/०२/२०१८
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.का.अधि-१९८८, कलमे Sections १२
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार बुधवार, तारीख पासून १४/२/२०१८ वेळ १४:३० तारीख पर्यंत १५/२/१८ वेळ ११:३० वा.
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख १४/०२/२०१८, वेळ १५:०० वा.
Information received at P. S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ४०/२०१८, तारीख १५/२/२०१८ वेळ २१:२० वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव सेंट फॉन्सीस चर्च शेजार वी.एस.सी. मैदानाचे जवळ विलेपार्ले, ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव ........
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण -, गाव -, पोस्ट -, तालुका -, जिल्हा -, राज्य -
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव -, तालुका -, जिल्हा -, राज्य -
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name संतोष पाटील (b) वडिलांचे / पतीचे नाव विठोबा पाटील
Father's / Husband's Name
(c) जन्म तारीख व वय २५/०५/१९७० (d) राष्ट्रीयत्व भारतीय फोन नं. ९८७०१५४५६६.
Date of Birth and Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक -, दिल्याचा दिनांक - दिल्याचे ठिकाण - (f) व्यवसाय नोकरी
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste हिंदू/मराठा जनजात Sub-Caste -
(h) पत्ता ........, गल्ली / सर्व्हे नं. ........ घर / नाव नं. ........ फोन / मो. नं. ........ पॅन नं. ........ वोटर्स नं. ........
Address : Ward House/Name No. Phone/M. No. PAN No. Card No.
रस्त्याचे नाव ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, पो. स्टे. ........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........, जिल्हा ........, राज्य ........ सध्याचा पत्ता वरळी पोलीस कॅम्प डी/७५ सरपोचखान पाखा रोड, वरळी, मुंबई.
Taluka Dist. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① मोहनदास कुमारन नायर रहि. ५३ वर्षे व्यवसाय-(वडापाव व जेवणाचे स्टॉल) रा.ठी. मरिअम्मन चाळ गल्ली नंबर - ०४ नेहरु नगर व्ही.पी.रोड विलेपार्ले पश्चिम मुंबई.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs)-8-2016-PA3-(K) 460

श्री. संतोष विठोबा पाटील, हिंदू वय-४८ वर्षे, यांनी दिलेला जबाब स्वतंत्र टंकलिखित केलेला असून तोच गुन्ह्याची पहिली खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

[signature]

(चंद्रसेन पालकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

[signature] PI 32264

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ रुपये - 3001/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

वर नमूद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी मोहनदास कुमरन नायर यांनी 'फि' याचे (सेंट फ्रान्सिस चर्च शेजारी बी.ग्राम सी. ऑरनाचे जवळ विलेपार्ले मुंबई या ठिकाणी त्याचे वडापाव व जेवणाचे स्टॉल व कॉस सिलेंडरवर कारवाई करु नये म्हणून 'फि' सदर महिन्याला रुपये 3001/- लाच देण्याकरिता प्रवृत्त करुन 3001/- रुची लाच दिली म्हणून भ्र.प्र.का. कलम-12 अन्वये गुन्हा दाखल

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

पोलीस निरिक्षक चंद्रसेन पालकर

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] P/132264

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature]
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name चंद्रसेन पालकर
पदनाम Rank पोलीस निरिक्षक, ला.प्र.वि. मुंबई.
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 26.02.2015
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

''जबाब'' दिनांक:— १५/०२/२०१८

संतोष विठोबा पाटील, वय—४८ वर्षे, धंदा—नोकरी, पोलीस नाईक क्रमांक ३२२६४/साताक्रुझ पोलीस ठाणे, मुंबई, रा.ठि. जी/७५, वरळी पोलीस वसाहत, सरपोचखानवाला रोड, वरळी मुंबई—३०. मो.नं. ९८७०१५४५६६.

मी, वरीलप्रमाणे असून, वर नमूद पत्यावर, माझी पत्नी, मुलगा यांचेसह राहावयास आहे. मी बृहन्मुंबई पोलीस दलामध्ये सन १९९३ मध्ये पोलीस शिपाई पदावर भरती झालो असून, सध्या सांताक्रुझ पोलीस ठाणे, मुंबई येथे जून—२०१५ पासून नेमणुकीस आहे. माहे जानेवारी २०१८ पासून साताक्रुझ पोलीस ठाणे हद्दीतील बिट क्रमांक ०३ मध्ये बीट मार्शल म्हणून कर्तव्य करीत आहे. बिट मार्शल कर्तव्य करीत असतांना गस्त करणे, अनाधिकृत धंदयावर व वाहनावर तसेच नियंत्रण कक्षाकडून आलेल्या संदेशानुसार कारवाई करीत असतो.जानेवारी २०१८ चे पहिल्या आठवडयात पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई येथील पोलीस नियंत्रण कक्ष येथून कॉल आला की सेंन्ट फ्रान्सीस चर्च रोडवर, बीएमसी मैदानाचे फुटपाथजवळ विलेपार्ले पश्चिम, मुंबई येथे वादविवाद चालू आहे. म्हणून मी सदर ठिकाणी पोलीस हवालदार क्र. २५९३०/यादव यांचेसह बिट मार्शल वाहनासह पोहोचलो. सदरवेळी वडापाव व जेवणाचे स्टॉल चालविणारा इसम नामे नायर (आण्णा) हा स्टॉल लावण्याचे जागेवरून दुसऱ्या इसमांशी वादविवाद करीत होता. त्यामुळे मी दोघांना पोलीस ठाणे येथे घेवून आलो. कर्तव्यावरील पोलीस अधिकारी याना रिपोर्ट केला. कर्तव्यावरील अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे नायर (आण्णा)यांचेवर १०२ मुंबई पोलीस कायदा अन्वये कारवाई केली. त्यानंतर २ ते ३ दिवसांनी मी कर्तव्यावर असतांना वडापाव व जेवणाचे स्टॉल चालविणारे इसमाची पत्नी ही फुटपाथवर स्टोव्हवर स्वयंपाक करीत होती. त्यावेळी मी तिला फुटपाथवर स्वयंपाक न करण्याबाबत सांगितले कारण जवळच खेळाचे मैदान असून सदर ठिकाणी लहाण मुले क्रिकेट खेळतात. कदाचित खेळतांना चेंडू स्वयंपाकात पडून अनुचित प्रकर घडू शकतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशी कर्तव्यावर असतांना वडापाव व जेवणाचा स्टॉल चालविणारा इसम नामे नायर (आण्णा) याने हाक मारून बोलाविले व सांगितले की ''साहेब मी तुम्हाला दर महिण्याला पैसे देईन माझे धंदयावर कारवाई करू नका'' असे वारंवार सांगत होता. मला नायर (आण्णा) याचेकडून पैसे घ्यायचे नव्हते, तरीसुध्दा नायर (आण्णा) हा मला त्याचे वडापाव व जेवणाचा स्टॉल चालु ठेवण्याकरीता पैसे घेण्याबाबत वारंवार प्रवृत्त करीत होता. म्हणून मी दिनांक १४/०२/२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात १४.३० वाजता तक्रार देण्याकरीता गेलो. सदर ठिकाणी सहायक पोलीस आयुक्त श्री रविंद्र पाटील यांनी माझी तक्रार ऐकूण घेतली. त्यानंतर माझी लेखी तक्रार पोनि पालकर यांनी घेतली. व माझी दिनांक १५/०२/२०१८ रोजी दिवसपाळी कर्तव्य असतांना मी पुढील कारवाईकरीता माझे कर्तव्याच्या ठिकाणी येण्याबाबत तक्रारीत सांगितले.

दिनांक १५/०२/२०१८ रोजी मी कर्तव्यावर असतांना सांताक्रुझ पोलीस ठाणे हद्दीतील बिट क्रमांक ०३ येथे सापळा पथक आले. त्यावेळी तक्रारीप्रमाणे ०९.३० वाजताचे सुमारास मला पोलीस निरीक्षक पालकर यांनी श्रीदेवी हॉटेल शेजारी बीएमसी मार्केटचे कंम्पाउंड येथे बोलावून घेतले. पोलीस निरीक्षक पालकर यांनी सापळा पथकामध्ये दोन इसम शासकिय पंच असल्याचे मला सांगून मी दिलेला

समक्ष

(चंद्रसेन पालकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी,मुंबई

PN32264

....२/—

तक्रार अर्ज त्यांना वाचावयास दिला. त्यावेळी दोन्ही पंचानी सदरचा तक्रार अर्ज वाचून त्यावर स्वाक्षरी केली व समक्ष म्हणून पोलीस निरीक्षक पालकर यांनी स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर मला सदर तक्रारीची शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. व पंचाचे समोर माझे व पंचांचे वक्तव्य एका डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर व पडताळणीचे वेळी घ्यावयाच्या योग्य त्या सुचना मला व पंचांना दिल्या. पो.नि. पालकर यांनी माझे बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावला. त्यानंतर मी पंच क्र. ०१ सुर्यराव यांचेसोबत अंदाजे १०.४० वाजताचे सुमारास चर्च रोड, विलेपार्ले पश्चिम येथे गेलो त्यावेळी जेवण व वडापावचे स्टॉल चालविणारा इसम नामे नायर (आण्णा) व त्यांची पत्नी हजर होती. मी त्यांना मला का बोलावित होता याबाबत विच.ारणा केली असता, आण्णा यांनी वडापाव व जेवणाचे स्टॉलवर तसेच गॅस सिलींडरवर कारवाई न करण्याकरीता रूपये ३००/— लाच दर महिन्याला घेण्याविषयी प्रवृत्त केले. त्यानंतर मी व पंच असे पोलीस वाहन उभे होते त्या ठिकाणी परत आलो. तेव्हा पोनि पालकर यांनी माझ्या शर्टाच्या खिशात ठेवलेला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. मला व पंचाना विचारणा करून डीजीटल व्हाईस रेकॉर्डवर झालेले संभाषण ऐकुन संभाषणात लाच घेण्याकरीता प्रवृत्त केलेबाबतची पडताळणी केली.

खाजगी इसम नामे नायर (आण्णा) याने मला लाच घेण्यासाठी प्रवृत्त केल्याचे स्पष्ट झाल्याने पोलीस निरीक्षक पालकर यांनी सापळापुर्व पंचनाम्याचे आयोजन केले. पोलीस निरीक्षक पालकर यांनी मला व पथकास सापळा कारवाईदरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या त्यानंतर पोलीस निरीक्षक पालकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करून माझ्या शर्टाच्या आतील बनियानला लावला. त्यानंतर आंम्ही सापळा कारवाई करीता पंच क्र.०१ श्री सुर्यराव यांचे सोबत इसम नायर ( आण्णा) यांना भेटण्याकरीता चर्च रोड, बीएमसी चे खेळाचे मैदानजवळ आलो. माझे मागोमाग सपोआ अहिरे, पो. नि. पालकर व पथक आले व त्यांनी सदर ठिकाणी सापळा लावला.

त्यानंतर जेवणाचे स्टॉल चालविणारा इसम नायर (आण्णा) याने मला पैसे घेण्याकरीता प्रवृत्त केले. व मला रुपये ३००/— त्याचे लेदर पॉकेटमधून काढून दिले. मला नायर (आण्णा) याने लाचेची रक्कम दिल्यानंतर पुर्व नियोजित ठरल्याप्रमाणे मी इशारा केला. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी जेवणाचे स्टॉल चालविणारा इसम नायर (आण्णा) यांस रंगेहाथ पकडले. त्यावेळी पोलीस निरीक्षक पालकर यांनी माझे बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक पालकर यांनी नायर यांस त्याचे नांव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नांव मोहनदास कुमारन नायर वय ५३ वर्षे, रा.ठि. मारी अम्मन चाळ, खोली क्र. ७४, नेहरूनगर, व्ही.एम. रोड, विलेपार्ले पश्चिम मुंबई असे असल्याचे सांगितले.

तरी सेंन्ट फ्रान्सीस चर्च रोडवर, बीएमसी मैदानाचे जवळ विलेपार्ले पश्चिम, मुंबई येथील फुटपाथवर जेवणाचे स्टॉल चालविणारा इसम नामे मोहनदास कुमारन नायर याने सदर ठिकाणचे त्याचे वडापाव व जेवणाचे स्टॉल व गॅस सिलेंडरवर कारवाई करू नये म्हणून मला दर महिन्याला रूपये ३००/— लाच घेण्याकरीता प्रवृत्त करून रूपये ३००/— ची लाच दिली. म्हणुन माझी त्याचेविरुध्द फिर्याद असून कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

समक्ष

(चंद्रसेन पालकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी,मुंबई